महाराष्ट्राच्या ग्रामीण व शहरी भागातील लोकप्रिय दैनिक

# दैनिक ठाणे जीवनदीप वार्ता

कार्यकारी संपादक : श्री. विजय यादव   jeevandeepvartanews2020@gmail.com   Rs.2/-   मुख्य संपादक : श्री. रविंद्र घोडविंदे

सोमवार ❖ १६ डिसेंबर २०२४ ❖ वर्ष ६ ❖ अंक - १७१ ❖ पाने - ४   RNI NO : MAHMAR/2016/72091 ■ Postal Reg. No. THC/256/2022-2024

## संपादकीय

## महाराष्ट्राचा ‘सुमंगल’ शपथविधी

**रविंद्र घोडविंदे**

तीन दशकांनंतर राज्य सरकारच्या मंत्र्यांचा शपथविधी मुंबईऐवजी नागपुरात झाला. यापूर्वी १९९१ मध्ये नागपुरात शपथविधी सोहळा पार पडला होता. त्यानंतर आज १५ डिसेंबर २०२४ मध्ये ३३ वर्षांनंतर मुंबईऐवजी नागपुरात शपथविधी पार परडल्याने हा ऐतिहासिक शासकीय विधी म्हणावा लागेल. दोन एक अपवाद वगळलेतर फारसं कुणी नाराज दिसत नसल्याने हा देवेंद्रजींनी नागपूरात आयोजित केलेला हा ‘सुमंगल सोहळा’ म्हणावा लागेल.

तर्क वितर्कांना बाजूला सासरत राज्य सरकारच्या मंत्रिमंडळाचा बहुप्रतिक्षीत विस्तार अखेर आज संपन्न झाला. नागपुरातील राजभवनात दिमाखदार सोहळयाचं आयोजन केलं होतं. उद्यापासून हिवाळी अधिवेशनाला सुरुवात होत आहे. त्याच्या एक दिवस आधी महायुतीच्या मंत्रिमंडळ विस्तार करण्यात आला. महायुतीचं सरकार सत्तेवर आल्यानंतर १० दिवसांनंतर मंत्रिमंडळ विस्तार संपन्न झाला. महायुतीच्या ३९ आमदारांनी आज मंत्रिपदाची शपथ घेतली. यामध्ये भाजपच्या सर्वाधिक १९ जणांचा समावेश आहे. तर शिवसेनेच्या ११, तर राष्ट्रवादी काँग्रेसच्या ९ जणांचा समावेश आहे. गेल्या मंत्रिमंडळातील काही जणांना डच्चू देत यंदा महायुतीमधील तिन्ही पक्षांनी मिळून २५ नवे चेहरे दिले आहेत. त्यामुळे या नवनिर्वाचित मंत्रिमंडळाचे दै.ठाणे जीवानदीप परिवाराकडून मनःपूर्वक अभिनंदन आणि आगामी कार्यकाळासाठी हार्दिक शुभेच्छा! आपण सर्वांच्या एकजुटीने राज्यातील सर्वसामान्य नागरिकांच्या कल्याणासाठी समर्पितपणे कार्य कराल, अशी अपेक्षा आहे !!

उपराजधानी असली तरी राज्याच्या राजकीय इतिहासात नागपूराचं स्थान विशेष आहे. इतिहासाची पाने चाळून पाहिली तर बऱ्याच ठिकाणी नागपूर हे केंद्रस्थानी होते. १९९१ मध्ये सुधाकर राव हे मुख्यमंत्री होते. त्यावेळी नागपुरात शपथविधी पार पडला होता. त्यानंतर छगन भुजबळ यांनी शिवसेना प्रमुख बाळासाहेब ठाकरे यांच्याविरोधात बंड करून काँग्रेसमध्ये प्रवेश केला होता. यानंतर सुधाकरराव नाईक सरकारमध्ये मंत्री झाले. २६ डिसेंबर १९९१ रोजी त्यांनी नागपुरात शपथ घेतली. त्यानंतर त्यांना कॅबिनेट मंत्री करण्यात आलं आणि महसूल, अल्पसंख्याक कल्याण विकास ही खाती त्यांच्याकडे होती.

१९९१ मध्ये सुधाकरराव नाईक मुख्यमंत्री बनल्यानंतर ते १ वर्ष २५४ दिवस मुख्यमंत्री पदावर होते. सुधाकरराव नाईक हे महाराष्ट्राचे दीर्घकाळ मुख्यमंत्री राहिलेले वंसतराव नाईक यांचे पुतणे होते. महाराष्ट्राच्या राजकारणात काका-पुतणे अशी वंसतराव नाईक आणि सुधाकरराव नाईक ही एकमेव जोडी मुख्यमंत्री बनली आहे. असा हा नगपूराचा राजकीय इतिहास खूप मोठा आहे तुर्तास एवढेच!

असो; आज शपथ घेणाऱ्या मंत्र्यांचा कार्यकाळ अडीच वर्षांचा असेल, असे राष्ट्रवादीचे अजित पवार यांनी शपथविधीपूर्वीच सांगितले होते. या निर्णयावर महायुतीचे सर्व सदस्यही आतातरी सहमत दिसत आहेत. एका अर्थानं हा प्रगतिशिल महाराष्ट्राचा सुमंगल शपथ विधी असाला तरी कोकणातील कुणबी समाजाचे एकमेव जेष्ठ आमदार किसन कथोरे यांची मंत्रिमंडळात निवड होणे अपेक्षित होते. त्या निमित्ताने कुणबी समाजाला न्याय मिळाला असता. भाजपा सोबत असणारा कुणबी समाज नाराज आहे. त्याचे पडसाद उमटू नयेत यासाठी कथोरे यांना सन्मानित करणारे पद दयावे अशी चर्चा होत आहे.



### २५ नवे चेहरे, ११ जणांना डच्चू

# फडणवीस सरकारच्या ३९ मंत्र्यांचा शपथविधी

**दै.ठाणे जीवनदीप वार्ता**

**मुंबई :** राज्यातील महायुती सरकारच्या मंत्रिमंडळाचा विस्तार नागपूरमधील राजभवन येथे संपन्न होत असून महायुती सरकारमध्ये एकूण ३९ आमदारांनी आज मंत्रिपदाची शपथ घेतली. त्यामध्ये, भाजप प्रदेशाध्यक्ष चंद्रशेखर बावनकुळे यांनी सर्वप्रथम शपथ घेतली. मी ... ईश्वर साक्ष शपथ घेतो की, असे म्हणत महायुतीमधील तिन्ही पक्षांनी मंत्रिपदाची शपथ घेतली. नागपूर येथील राजभवनवर राज्यपाल राधाकृष्णन यांनी सर्वच मंत्र्यांना पद व गोपनियतेची शपथ दिली. त्यामध्ये, ३३ कॅबिनेटमंत्री तर ६ राज्यमंत्र्यांचा शपथविधी सोहळा संपन्न झाला. राज्यातील महायुती सरकारच्या मंत्रिमंडळात ४ लाडक्या बहिणींना संधी देण्यात आली आहे. पंकजा मुंडेसह आदिती तटकरे यांना दुसऱ्यांदा संधी मिळाली आहे. तर, मेघना बोर्डीकर आणि माधुरी मिसाळ हे दोन नवे चेहरे मंत्रिमंडळात आले आहेत.

राज्यातील महायुती सरकारमधील ३९ मंत्र्यांचा शपथविधी आज नागपूर येथील राजभवनमध्ये संपन्न झाला. यापूर्वी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्यासह उपमुख्यमंत्री म्हणून एकनाथ शिंदे व अजित पवार यांचा शपथविधी मुंबईत संपन्न झाला होता. त्यानंतर, सर्वांचं लक्ष लागलेल्या मंत्रिमंडळ विस्ताराच मुहूर्त अखेर आज संपन्न झाला. त्यानुसार, ४ लाडक्या बहिणींसह ३९ मंत्र्यांनी शपथ घेतली. त्यामध्ये ३३ कॅबिनेट मंत्री तर ६ राज्यमंत्र्यांनी शपथ घेतली आहे. या शपथविधी सोहळयासाठी राज्यपाल राधाकृष्णन यांच्यासह मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस व अनेक दिग्गज नेते व्यासपीठावर होते. प्रशासनातील वरिष्ठ अधिकारी देखी या मंत्रिमंडळा विस्तार सोहळयाला उपस्थित होते.

**मुख्यमंत्र्यांसह एकूण ४२ मंत्री**

राज्यातील महायुती सरकारमध्ये मुख्यमंत्री, दोन उपख्यमंत्री आणि ३९ मंत्री असे एकूण ४२ मंत्र्यांचा शपधविधी संपन्न झाला आहे. राज्याती मंत्रिमंडळातील मंत्र्यांची संख्या ४३ आहे, त्यामुळे, अद्यापही एक जागा शिल्लक असल्याचे पाहायला मिळते. दरम्यान, ४२ मंत्र्यांमध्ये ४ महिला पान ४ वर ▶▶

### ४ लाडक्या बहिणींना संधी



महायुती सरकारमध्ये लाडक्या बहिणींना मंत्रिपदाची संधी मिळणार असे सांगितले जात होते. त्यानुसार, आज ४ लाडक्या बहिणींना मंत्रिपदाची संधी मिळाली असून २ नवे चेहरे मंत्रिमंडळात सहभागी झाले आहेत. त्यामध्ये, पर्वत मतदारसंघातून विजयी झालेल्या भाजप आमदार माधुरी मिसाळ यांना राज्यमंत्रीपदी संधी देण्यात आली आहे. तर, परभणी जिल्ह्यील जिंतूर मतदारसंघाती भाजप नेत्या मेघना बोर्डीकर यांनीही मंत्रिपदाची शपथ घेतली आहे. याशिवाय, भाजप नेत्या पंकजा मुंडे आणि राष्ट्रवादीच्या आमदार आदिती तटकरे यांनी दोन्ही अनुभवी महिला नेत्यांनी दुसऱ्यांदा मंत्रिपदाची शपथ घेतली. त्यामध्ये, आदिती तटकरे यांनी तिसऱ्यांदा शपथ घेतली आहे. एकूण, ४ लाडक्या बहिणींना मंत्रिमंडळात स्थान देण्यात आले असून भाजपकडून ३ आणि राष्ट्रवादीकडन १ महिला नेत्यांना संधी मिळाली आहे. तर, शिवसेना शिंदे गटाकडून एकही महिला नेत्यांस संधी मिळाली नाही.

### दिग्गजांना डच्चू ?



**फडणवीसांच्या मंत्रिमंडळात अनेकांना आपलं मंत्रिपद राखता आलं नाही. खरं तर हे नेते फडणवीस सरकारमध्ये मंत्रिपदाचे प्रबळ दावेदार म्हणून ओळखले जात होते, पण त्यांना यावेळी डावलण्यात आलं आहे, त्यामुळे अनेकांच्या भुवया उंचावल्या आहेत. यात सुधीर मुनगंटीवार, विजयकुमार गावित, रविंद्र चव्हाण, सुरेश खाडे, तानाजी सावंत, अब्दुल सत्तार, दीपक केसरकर, छगन भुजबळ, दिलीप वळसे-पाटील, अनिल पाटील, संजय बनसोडे यांचा समावेश आहे**



**शिवेंद्रराजे, नितेश राणे, योगेश कदमांना**

### पहिल्यांदाच संधी

महायुती सरकारच्या मंत्रिमंडळात यंदा तिन्ही पक्षांनी नव्या चेहऱ्यांना प्राधान्याने संधी दिली आहे. त्यामध्ये, भाजपने साताऱ्यातून शिवेंद्रराजे भोसले यांना संधी दिली असून कणकवलीतून नारायण राणेपुत्र आमदार नितेश राणे यांनाही संधी मिळाली आहे. तसेच, पहिल्यांदाच आमदार बनललेल्या योगेश कदम यांनाही शिवसेनेनं मंत्री करुन कोकणात आपलं स्थान बळकट करण्याचा प्रयत्न केला आहे. योगेश कदम हे शिवसेना नेते रामदास कदम यांचे सुपुत्र आहेत. यांसह अनेक नव्या चेहऱ्यांना पहिल्यांदाच मंत्रिमंडळात स्थान मिळालं असून पुण्यातून माधुरी मिसाळ आणि मेघना बोर्डीकर या लाडक्या बहिणींनाही मंत्रीपदाची संधी मिळाली आहे.

**मुंबईतील पहिला शपथविधी सोहळा**

**देवेंद्र फडणवीस : मुख्यमंत्री**
**एकनाथ शिंदे : उपमुख्यमंत्री**
**अजित पवार : उपमुख्यमंत्री**

-----------------------

**नागपूर मधील २रा शपथविधी सोहळा**

**कॅबिनेट मंत्री**

१.चंद्रशेखर बावनकुळे
२.राधाकृष्ण विखे पाटील
३.हसन मुश्रीफ
४.चंद्रकांत पाटील
५.गिरीश महाजन
६.गुलाबराव पाटील
७.गणेश नाईक
८.दादाजी भुसे
९.संजय राठोड
१०.धनंजय मुंडे
११.मंगलप्रभात लोढा
१२.उदय सामंत
१३.जयकुमार रावल
१४.पंकजा मुंडे
१५.अतुल सावे
१६.अशोक उईके
१७.शंभूराज देसाई
१८.आशिष शेलार
१९.दत्तात्रय भरणे
२०.अदिती तटकरे
२१.शिवेंद्रराजे भोसले
२२.माणिकराव कोकाटे
२३.जयकुमार गोरे
२४.नरहरी झिरवाळ
२५.संजय सावकारे
२६.संजय शिरसाट
२७.प्रताप सरनाईक
२८.भरत गोगावले
२९.मकरंद पाटील
३०.नितेश राणे
३१.आकाश फुंडकर
३२.बाबासाहेब पाटील
३३.प्रकाश आबिटकर

-----------------------

**राज्यमंत्री**

३४. माधुरी मिसाळ
३५. आशिष जयस्वाल
३६. तुषार राठोड
३७. मेघना बोर्डीकर
३८. इंद्रनील नाईक
३९. योगेश कदम

# तीनशे मीटरपर्यंतच्या भूखंडावरील बांधकामांना प्रभागस्तरावर मंजुरी

**आयुक्त डॉ. इंदुराणी जाखड यांच्या संकल्पनेतून पथदर्शी प्रस्ताव**

*********

**जमीन मालक, विकासकांचे प्रश्न कायमचे निकाली निघणार**

**दै.ठाणे जीवनदीप वार्ता**

**कल्याण -** शासनाच्या एकत्रित विकास नियंत्रण व प्रोत्साहन नियमावलीचा आधार घेऊन कल्याण डोंबिवली पालिका प्रशासनाने १५० ते ३०० चौरस मीटर भूखंडावरील इमारतींचे बांधकाम आराखडे पालिकेच्या प्रभागस्तरावर स्वीकारणे आणि मंजूर करण्याचा पथदर्शी प्रस्ताव राबविण्याचा निर्णय घेतला आहे. या निर्णयामुळे लहान भूखंड विकसित करणे, जुनी बांधकामे नियमित करण्याचा जमीन मालक, विकासकांचा प्रश्न कायमचा निकाली निघणार आहे. कल्याण डोंबिवली पालिका आयुक्त डॉ. इंदुराणी जाखड यांच्या संकल्पनेतून हा पथदर्शी प्रस्ताव नगररचना विभागाचे प्रभारी साहाय्यक संचालक सुरेंद्र टेंगळे यांच्या पुढाकाराने राबविण्यात येत आहे. कल्याण डोंबिवली पालिका हद्दीतील नव्या इमारतींचे बांधकाम परवानगीसाठीचे आराखडे नगररचना विभागाकडून पान ४ वर ▶▶




# मुंबई विद्यापीठाच्या विविध प्राधिकरणांवर निवडणूक नामनिर्देशनाचे निकाल जाहीर



**व्यवस्थापन परिषद, विद्या परिषद, स्थायी समिती आणि अध्यापक व कर्मचारी तक्रार निवारण समितीवर अधिसभेतून निवड**

### विद्यापरिषदेवर व्यवस्थापन प्रतिनिधी गटातून रविंद्र घोडविंदे यांची बिनविरोध निवड

**दै.ठाणे जीवनदीप वार्ता**

**मुंबई,** दि. १५ डिसेंबरः महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम २०१६ मधील तरतूदींनुसार मुंबई विद्यापीठाच्या व्यवस्थापन परिषद, विद्या परिषद, स्थायी समिती आणि अध्यापक व कर्मचारी तक्रार निवारण समितीवरील निवडणूक/नामनिर्देशाचे निकाल आज पार पडलेल्या विशेष अधिसभेच्या बैठकीत जाहीर करण्यात आले. यानुसार व्यवस्थापन परिषदेवर प्राचार्य गटातून प्रा. दिलीप भारमल (खुला प्रवर्ग) आणि प्रा. दिलीप पाटील (इतर मागासवर्ग प्रवर्ग) यांची बिनविरोध निवड झाली. तर अध्यापक गटातून झालेल्या एकूण ६९ मतदानातून डॉ. अनुप पळसोकर ( खुला प्रवर्ग) हे ५१ मतांनी निवडून आले. तर डॉ. जगन्नाथ खेमनर (विमुक्त जाती प्रवर्ग) हे बिनविरोध निवडून आले. व्यवस्थापन प्रतिनिधी गटातून सुनील पान ४ वर ▶▶



# रघुनाथ खाकर यांना राज्यस्तरीय आदर्श आदिवासी समाजसेवक पुरस्कार



❍ दै.ठाणे जीवनदीप वार्ता ❍

**मुरबाड दि.१५**
**बाळासाहेब भालेराव**

प्रेरणा फाउंडेशनच्या वतीने दरवर्षी संपूर्ण राज्यातून विविध क्षेत्रात उल्लेखनीय कामगिरी करणाऱ्या व्यक्तीला राज्यस्तरीय पुरस्कार दिला जातो त्यामध्ये क्रीडा कला शैक्षणिक संस्था समाजसेवा करणार्या व्यक्तीची निवड केली जाते त्यामध्ये मुरबाड तालुक्यातील वाल्हिवरे गावातील आदिवासी समाजाचा खराखुरा समाज सेवक सर्वांच्या सुखात दुःखात धाऊन जणारा खरा हिरा रघुनाथ खाकर यांना आदिवासी समाज सेवक राज्यस्तरीय आदर्श पुरस्कारार्कता निवड केल्याबद्दल सर्वांच स्तरातून रघुनाथ खाकर यांच्या वर कौतूकाचा वर्षाव होत आहे,

हा पुरस्कार वितरण सोहळा,बदलापूर येथील हेंद्रेपाडा येथे संपन्न झाला, त्यावेळी त्यांच्या सोबत माजी उपसभापती अरूणा खाकर, पोलिस पाटील चंदर भला, लोकसेवा संस्थेचे उपाध्यक्ष मालोजी मेंगाळ, शिक्षक रावसाहेब खेडकर इत्यादी उपस्थित होते,

# पेपरवर बोलू काही ?
## सातपाटी येथे शैक्षणिक मार्गदर्शन सत्राचे आयोजन



❍ दै.ठाणे जीवनदीप वार्ता ❍

**पालघर प्रतिनिधी**

**पालघर :** सातपाटी येथे कलादर्पण संस्था सातपाटीच्या वतीने शासकीय मत्स्य . माध्यमिक शाळा सातपाटी येथे सातपाटी गावातील माध्यमिक शाळा शासकीय मत्स्य . माध्य . शाळा सातपाटी आणि रायजिंग स्टार इंग्लिश हायस्कुल सातपाटी च्या इ .१०वी च्या विद्यार्थ्यांसाठी आयोजित पेपरवर बोलू काही ... या शैक्षणिक मार्गदर्शन सत्राचे यशस्वी आयोजन करण्यात आले होते . दोन्ही शाळांतील एकूण ५६ विद्यार्थ्यांनी या सत्राचा लाभ घेतला . या शैक्षणिक मार्गदर्शन सत्रासाठी किरण धारणे (अणू विकास दांडी विद्या . ) आणि समिधा पाटील ( निजप हाय . शिरगांव )हे मार्गदर्शक लाभले होते . दोन्ही मार्गदर्शकांनी त्यांच्या अनुभवसंपन्न ज्ञानाने विद्यार्थ्यांना अनमोल मार्गदर्शन केले .पेपर लिहिताना कोणती खबरदारी घ्यावी ?अभ्यास कसा करावा ?विषयाचा पेपर पॅटर्न समजून घेणे आणि आपल्यातील सकारात्मक ऊर्जेला जागृत करून यश संपादन कसे करावे ?अशा विषयांवर सखोल मार्गदर्शन करण्यात आले .विदयार्थ्यांनीही त्यांचे प्रश्न विचारून चर्चा केली .

या शैक्षणिक मार्गदर्शन सत्रामुळे इ .१०वी च्या विदयार्थ्यांना प्रेरणा मिळून आत्मविश्वास नक्कीच दुणावला आहे . संस्कृती कलादर्पण संस्था सातपाटी च्या वतीने वर्षभर गावातील विद्यार्थी , कलाकारांसाठी शैक्षणिक , सांस्कृतिक कार्यक्रमांचे आणि विविध उत्सवांचे आयोजन करून संस्कृती संवर्धनाचे कार्य केले जाते . त्यामुळे संस्थेने गावाची सांस्कृतिक , सामाजिक परंपरा जपण्याचा वारसा सुरु ठेवला आहे.

# मुरबाडमध्ये इष्टांका अभावी अनेक लाभार्थी वंचीत !

**दै.ठाणे जीवनदीप वार्ता**

**मुरबाड दि.१५ (प्रतिनिधी)** मुरबाड तालुक्यात रास्त भावाची १९६ दुकाने आसून यामध्ये शासनाच्या अंत्योदय अन्न योजना व प्राधान्य कुटुंब योजने अंतर्गत केशरी पिवळया शिधापत्रिका धारकांना धान्य दिले जाते . यात अनेक दिवसापासून इष्टांका अभावी साधारणपणे७००च्या पुढील लाभार्थी धान्यापासून वंचीत आहेत.

यामध्ये शिधापत्रिका विभक्त केलेले ’ नवीन शिधापत्रीका काढलेले शिधापत्री केवर नावे समाविष्ट करावयाचे . ऑन लाईन होऊन नावे डिलीट झालेले शिधापत्रिका धारकांचा समावेश आहे . हे .लाभार्थी गरीब कुटुंबातील आसूनअदिवाशी . दलीत .इतर मागासवर्गीय व खुल्या प्रवर्गातील आहेत . याबाबत पुरवठा विभाकडे चौकशी केली आसता इष्ठांक नसल्याने त्यांना धान्य मिळत नसल्याचे समजते . हा इंष्ठाक मिळावा म्हणून जेष्ठ सामाजिक कार्यकर्ते व लोकमित्र रमेश हिंदुराव यांनी .तहसीलदार व .पुरवठा अधिकारी ठाणे यांना प्रत्यक्ष भेटून निवेदन दिले आसून.

हा इष्टांक वाढऊन मिळावा म्हणून प्रधान सचीव अन्न नागरी पुरवठा विभाग मंत्रालय यांना दिले आसुन संमधीत वंचीत लाभार्थ्यांना सोबत घेऊन आंदोलन करणार आसल्याचे लेखी कळविले आहे.

# जन्मदात्या आईने पाण्यात बुडवून केली मुलाची हत्या

**दै.ठाणे जीवनदीप वार्ता**
**□ नरेंद्र पाटील**

**पडघा दि. १४ :** सासू, सुनेच्या भांडणाच्या पर्यावसनात अवघ्या १ वर्षीय बालकाला आपला जीव गमवावा लागल्याची दुर्दैवी घटना भिवंडी तालुक्यातील कासणे गावात घडली आहे.

घरगुती भांडणातून जन्मदात्या आईनेच पोटच्या मुलाला पाण्याने भरलेल्या टाकीत बुडवून ठार मारल्याने परीसरात खळबळ उडाली आहे. आई अपेक्षा संदेश भोई (२३) हिच्या विरोधात पडघा पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करून अटक केली आहे. 'पार्थ' असे हत्या झालेल्या दुर्दैवी मुलाचे नाव आहे. भिवंडी तालुक्यातील कासणे गावात संदेश भोई यांचे कुटूंब राहते. आरोपी अपेक्षा व संदेश या दाम्पत्याला वर्षभरापूर्वी पार्थ (१) हा मुलगा झाला परंतु त्याला जन्मतःच आजार असल्याने त्याच्यावर मुंबईतील वाडीया रुग्णालयात उपचार सुरु होते.त्यातच आरोपी अपेक्षा हीची सासू मंगळवारी पार्थ याला घेऊन टिटवाळा येथे नंणदेकडे गेली होती. तेथील हवामान आजारी पार्थला काही मानवले नाही. बदललेल्या हवामानामुळे त्याला ताप आला. म्हणून सासू पार्थला घेऊन पुन्हा मंगळवारी रात्री घरी कासणे गावी आली. पार्थची प्रकृती बिघडल्यावरुन अपेक्षा व सासूमध्ये रात्री जोरदार भांडण झाले. हे भांडण मिटवून संदेश कामावर गेला होता. त्यानंतर (बुधवार )पहाटे रात्रपाळीवरुन संदेश घरी व आला मुलासोबत खेळता खेळता गाढ झोपला असतांनाच आई अपेक्षा हिने सर्वांची नजर चुकवून पहाटेच्या सुमारास घराच्या पहिल्या माळयावर पाण्याने भरलेल्या टाकीत पार्थला बुडवून त्याची हत्या केली.

सदर गुन्ह्याचा अधिक तपास सुरु असल्याची माहिती पडघा पोलीस ठाण्याचे पोलीस निरीक्षक बाळा कुंभार यांनी दिली. सदर महीलेला न्यायालयात हजर केले असता तिला न्यायालयीन कोठडीत ठेवण्याचे आदेश दिले आहेत.

# ध्येयप्राप्तीसाठी कठोर मेहनत आवश्यक
## -प्रसिद्ध गीतकार डॉ. विनायक पवार





**दै.ठाणे जीवनदीप वार्ता**
**□ प्रतिनिधी**

**पेण :** आयुष्यामध्ये ध्येय निश्चिती आवश्यक असून ठरवलेल्या ध्येय प्राप्तीसाठी कठोर मेहनत आवश्यक असल्याचे प्रतिपादन मराठी चित्रपट सृष्टीतील सुप्रसिद्ध गीतकार प्राध्यापक डॉ.विनायक पवार यांनी पेण येथील महात्मा गांधी वाचनालयाच्या सभागृहात केले.

महाराष्ट्र राज्य शिक्षक परिषद प्राथमिक विभाग शाखा पेण यांच्या विद्यमाने आयोजित इयत्ता दहावी बारावीच्या विद्यार्थ्यांसाठी 'चला आयुष्य घडवूया' या मार्गदर्शन शिबिराप्रसंगी ते बोलत होते.ते पुढे म्हणाले की, आपल्या आई -वडिलांचे कष्ट नेहमी आपल्या डोळयांपुढे असले पाहिजे. आपल्या ओघवत्या वाणीने त्यांनी अनेक दाखले देत विद्यार्थ्यांना प्रेरणादायक मार्गदर्शन केले. यावेळी त्यांनी आपल्या राष्ट्रीय पारितोषिक प्राप्त ख्वाडा, बबन, नाद या चित्रपटातील स्वतःच्या गीत रचना सादर केल्या व शेवटी आजोबा ही हृदयस्पर्शी कविता सादर करून उपस्थितांची मनेही जिंकली.

याप्रसंगी उपस्थित असलेले पेण एज्युकेशन सोसायटीचे अध्यक्ष मंगेश नेने यांनी महाराष्ट्र राज्य शिक्षक परिषदेचे कौतुक करताना सांगितले की, दहावी बारावीच्या विद्यार्थ्यांसाठी असे मार्गदर्शन शिबिर गरजेचे असून याद्वारे विद्यार्थ्यांना अभ्यास करण्यास चालना मिळेल. या शिबिरामध्ये इयत्ता दहावी मध्ये ९७.२०% गुण मिळवून सौ.म.ना.नेने विद्यालयात प्रथम आलेली कुमारी तीर्था संतोष सावंत या विद्यार्थिनीची प्रकट मुलाखत आयोजित केली होती. या मुलाखतीद्वारे अभ्यासाच्या वेळेचे नियोजन, तिने घेतलेली मेहनत, मोबाईलचा वापर, इंग्रजी भाषेची शब्दसंपत्ती कशी वाढवावी, गणितातील थेरम कसे सोडवावे व परीक्षेचा सराव कसा करावा याबाबत आपली मते मांडली. या कार्यक्रमासाठी माजी नगरसेवक पांडुरंग जाधव, महाराष्ट्र राज्य शिक्षक परिषद प्राथमिक विभागाचे राज्य अध्यक्ष राजेश सुर्वे, राज्य प्रसिद्धीप्रमुख वैभव कांबळे, जिल्हा अध्यक्ष उदय गायकवाड, कार्यवाह विजय पवार, पेण तालुका अध्यक्ष महेंद्र गायकवाड, महिला आघाडी प्रमुख रंजना पाटील, केंद्रप्रमुख दत्तात्रेय कोठेकर, माजी केंद्रप्रमुखा श्वेता म्हात्रे, शिक्षक परिषदेचे कार्यकर्ते, विद्यार्थी , पालक व शिक्षक मोठ्या संख्येने उपस्थित होते. कार्यक्रम यशस्वी होण्यासाठी शिक्षक परिषदेच्या सभासदांनी अपार मेहनत घेतली.

# मुरबाड तालुक्यात दत्त जयंती उत्साहात साजरी

**दै.ठाणे जीवनदीप वार्ता □ प्रतिनिधी**

**मुरबाड दि.१५-** मुरबाड तालुक्यातील सरळगाव, टोकावडे ,धसई ,म्हसा, शिवळे,कोरावळे तसेच मुरबाड शहर परिसरात, तसेच पतिपंढरपुर धानिवली येथे पारंपरिक पध्दतिने दत्त जयंती उत्सव उत्साहात साजरा झाला.



बुधवार, गुरुवार, शुक्रवार शनिवारी असे चार दिवस रात्री हरिपाठ, भजन, प्रवर्चन, किर्तन सेवा इत्यादी कार्यक्रम कार्यक्रम पार पडले. यामध्ये श्री गुरुदेव दत्त जयंती याविषयी प्रबोधन करण्यात आले. तर मुरबाड तालुक्यातील कोरावळे गावात तीन ठिकाणी ठिकाणी श्री दत्त जयंतीचा उत्सव मोठ्या उत्साहात साजरा करण्यात आला या ठिकाणी ह.भ.प. कीर्तनकार दामोदर ठाकरे महाराज यांनी शनिवारी हनुमान मंदिराच्या प्रांगणात चांगली कीर्तन सेवेद्वारे दत्त जयंतीच्या दिवशी विशेष प्रबोधन केले.

या कोठावळे ठिकाणी शनिवारी रात्री किर्तन सेवा आटोपल्यानंतर लगेच महाप्रसादाचा लाभ कोरावळे पंचक्रोशीतील भक्त भाविकांनी घेतला.

तर पतिपंढरपुर धानिवली येथे काळयाच्या किर्तनाच्या दिवसी हजारो भक्तांनी महापसादाचा लाभ घेतला.

# जीवनदीप महाविद्यालयास नॅक 'बी' ग्रेड

**दै.ठाणे जीवनदीप वार्ता**
**□ प्रतिनिधी**



**कल्याण :** जीवनदीप शैक्षणिक संस्था संचलित कला वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय खर्डी ता शहापूर येथे दिनांक ४ व ५ डिसेंबर रोजी महाविद्यालयाच्या नॅक मूल्यांकनाकरिता डॉ व्ही. दुर्गा भवानी ( तिरूपती), डॉ?.एस वसंथा ( चेन्नई), डॉ हारेन साकिया (आसाम) यांच्या त्रिसदस्यीय समितीने भेट देऊन मागील पाच वर्षांच्या कामकाजाचा आढावा सात घटकांच्या आधारे घेतला.त्याच बरोबर विद्यार्थी, पालक, माजी विद्यार्थी, संस्था प्रतिनिधी, कर्मचारी यांच्याशी संवाद साधला. यात महाविद्यालयाने पहिल्याच प्रयत्नात बी ग्रेड प्राप्त केला. यामुळे महाविद्यालयाच्या शिरपेचात मानाचा तुरा खोवला गेला.

या महाविद्यालयाची स्थापना २००८ साली जीवनदीप शैक्षणिक संस्थेच्या माध्यमातून रविंद्र घोडविंदे यांनी केली होती. खर्डी सारख्या आदिवासी बहुल व दुर्गम भागात ज्ञानदानाचे कार्य महाविद्यालययाच्या माध्यमातून केले जाते. महाविद्यालय हे विनाअनुदानित असून गुणवत्तेशी कुठल्याही प्रकारची तडजोड केली जात नाही.

याबद्दल संस्थेचे अध्यक्ष रविंद्र घोडविंदे, स्मिता घोडविंदे , प्रशांत घोडविंदे, अनिल घोडविंदे, प्र.प्राचार्य कैलास कळकटे यांनी महाविद्यालाचे अभिनंदन केले. प्रा विशाल भोसले यांनी समन्वयक म्हणून जबाबदारी पार पाडली. तर सगळ्याच शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी यांनी या प्रक्रियेसाठी अतिशय परिश्रम घेतले.

# मुरबाड : महावितरण उपविभागीय अधिकाऱ्यास दहा हजारांचा दंड !

## चुकीची बिले पाठविणे, पुरेशा दाबाने वीजपुरवठा न पुरविणे, मनमानी कारभार याविषयी ग्राहक तक्रार निवारण मंचाने घेतली गंभीर दखल

## - अधिकाऱ्यांच्या व कर्मचाऱ्यांच्या चौकशीचे आदेश!

**दै.ठाणे जीवनदीप वार्ता**
**□ प्रतिनिधी**

मुरबाड दि.१५-(प्रतिनिधी ) मुरबाड येथील शेतघराला सतत व पुरेशा दाबाने वीजपुरवठा न केल्यामुळे सर्व स्तरांवरील अधिका-यांकडे वारंवार तक्रारी करूनही त्याकडे डोळेझाक करणा-या महावितरणच्या मनमानी कारभाराविरुद्ध केस दाखल केली असता, त्याची ग्राहक तक्रार निवारण मंचाने तातडीने दखल घेऊन तक्रारीची दखल न घेणाऱ्या महावितरणच्या मुरबाड येथील उपअभियंता यांना १० हजारांचा वैयक्तिक दंड ठोठावत दंडाची रक्कम ४५ दिवसात भरणा करून त्याबाबतचा अहवाल ६० दिवसांच्या आत सादर करण्याचे आदेश मंचाकडून देण्यात आले आहेत.

ऑनलाइन दाखल केलेल्या तक्रारींवर कोणतीही कार्यवाही न करून वीजपुरवठा सुरळीत न करताच तक्रारींचे निवारण केल्याचे भासवून, 'तक्रार सोडविल्याचे बंद केल्याचे' खोटे अहवाल देणे, तक्रारींचा प्रत्यक्षात पाठपुरावा केल्यानंतरही चुकीची व दिशाभूल करणारी माहीती पुरविणे, एकमेकांवर जबाबदारी ढकलणे, अशा सर्व बाबींची तक्रार अर्जदार शर्मिला हाबडे यांनी केली होती. सदर तक्रारीची शहानिशा खुद्द ग्राहक तक्रार निवारण मंचाने करून तातडीने वीजपुरवठा सुरळीत करणेबाबतच्या सूचना महावितरणच्या संबंधीत अधिका-यास दि. ०७/११/२०२४ रोजी दिलेल्या होत्या. ग्राहक तक्रार निवारण मंचाने दिलेल्या सुचनानंतरही काहीही कारवाई संबंधित अधिकाऱ्यांनी न केल्यामुळे या प्रकरणातील प्रत्यक्ष सुनावणी दिनांक २२/११/२०२४ रोजी ग्राहक तक्रार निवारण मंचाकडून निश्चित करण्यात आली. सदर सुनावणीवेळी सुद्धा

महावितरणाचा एकही अधिकारी उपस्थित नव्हता. त्यामुळे, प्रामाणिक वीज ग्राहकाला निष्कारण त्रास दिला जात आहे तसेच मंचाकडून दिलेल्या सुचनासुद्धा विचारात घेतल्या जात नाहीत याची खात्री झाल्यामुळे तसेच प्रत्यक्षात सुनावणीच्या वेळीसुद्धा गैरहजर राहून मंचाचाही आदर न राखणे या सर्व बाबींची अत्यंत गंभीर दखल घेत या संपूर्ण प्रकरणाची चौकशी करणे, ग्राहकाच्या झालेल्या नुकसान भरपाईची रक्कम महावितरणच्या जबाबदार अधिका-यांकडून वैयक्तिक दंडाच्या स्वरूपात वसूल करावी, ग्राहक मंचांच्या सूचनांचा आदर न करणाऱ्या महावितरणच्या संबंधीत अधिकाऱ्यांविरुद्ध शिस्तभंगाची कार्यवाही सुरू करावी तसेच संबंधीत लाईनमन गायकर याच्याही मनमानी/ बेफिकीर कारभाराची आवश्यक ती चौकशी सुरू करावी, असे अत्यंत खरमरीत आदेश . गिरीश महाजन यांच्या अध्यक्षतेखालील ग्राहक तक्रार निवारण मंचाने महावितरणचे अधीक्षक अभियंता यांना दिलेले आहेत.

अशाच एका दुसऱ्या प्रकरणात श्री. दिलीप करमरकर यांच्या मुरबाड येथील फार्म हाउसमध्ये विजेच्या वापराचे बिलावर नमूद करण्यात आलेले युनिट आणि प्रत्यक्षातील मीटरवरील युनिट यामध्ये तफावत आढळून आल्यामुळे त्याबाबतची तक्रार त्यांनी महावितरणकडे केली होती. त्यावेळी मीटरमध्ये बिघाड असल्याचे सांगत त्यांना मीटर बदलण्याचा चुकीचा सल्ला देण्यात आला होता. मात्र, महावितरणकडून केलेल्या तपासणीत मीटर सुस्थितीत असल्याचे आढळून आले होते. त्यानंतरही करमरकर यांना नियमित ४५०० रुपये बिल पाठवले जात असल्याने त्यांनी याबाबत ग्राहक तक्रार निवारण मंचाकडे संपूर्ण पुराव्यासह तक्रार दाखल केली होती. त्या प्रकरणी सुद्धा ग्राहक तक्रार निवारण मंचाने संबंधीत अधिका-यास दिनांक १०/१०/२०२४ रोजीच्या आदेशाने दहा हजारांचा दंड ठोठावला आहे.

सदर दोन आदेशांमुळे मुरबाडच्या महावितरण कार्यालयातील अधिकाऱ्यांच्या अरेरावीला/ मनमानी कारभाराला चाप बसेल तसेच प्रामाणिक ग्राहकांकडे पाहण्याचा

त्यांचा दृष्टिकोण बदलेल अशी आशा व्यक्त करून ग्राहकांनी सुद्धा आपल्या वीजबिलाची शहानिशा करावी व आपली महावितरणकडून होणारी फसवणूक टाळावी, असे आवाहन दिलीप करमरकर यांनी केले आहे.

मुरबाड तालुका प्रगतिशील शेतकरी संघाच्या सभासद असलेल्या शर्मिला हाबडे यांचेशी संपर्क केला असता, त्यांनी 'इतर तालुक्यांच्या तुलनेने मुरबाड तालुक्याचा शेती, पर्यटन तसेच औद्योगिक विकास मागे राहण्यास योग्य दाबाचा अनियमित वीजपुरवठा हे एक प्रमुख कारण असल्याचे नमूद करत महावितरणच्या अधिकारी/ कर्मचारी वर्गाची मानसिकता बदलणे आवश्यक असल्याचे मत त्यांनी व्यक्त केले. मंचाच्या आदेशाची गंभीरतेने अंमलबजावणी न झाल्यास पुढील सनदशीर मार्ग अवलंबिणेत येईल तसेच येत्या अधिवेशनातसुद्धा या विषयावर लक्ष वेधणयासाठी लोकप्रतिनिधीकडेही मागणी करण्यात येत असल्याचे त्यांनी आवर्जून निदर्शनास आणून दिले.







सोमवार
१६ डिसेंबर २०२४

**मेष**
वैयक्तिक आयुष्यातील जबाबदारी वाढू शकते. दिवस संमिश्र जाईल. आज कोणताही निर्णय घेण्यापूर्वी कुटुंबातील सदस्यांचे मत अवश्य घ्या. काही काम करण्याची उत्सुकता वाढेल.

**वृषभ**
स्पर्धा परीक्षांची तयारी करणारे विद्यार्थी त्यांच्या गंतव्यस्थानापर्यंत पोहोचण्यात यशस्वी होतील. सन्मान होईल. रक्तदाबाच्या रुग्णांनी काळजी घ्यावी.

**मिथुन**
समाधान वाढेल. तुमच्या वैयक्तिक आयुष्यातील जबाबदारी वाढू शकते. आज तुमचा दिवस संमिश्र जाईल. आज कोणताही निर्णय घेण्यापूर्वी कुटुंबातील सदस्यांचे मत अवश्य घ्या.

**कर्क**
आज तुमचे आरोग्य चांगले राहील, तुम्ही उर्जेने परिपूर्ण असाल. सरकारी नोकऱ्या असलेल्या लोकांना लवकरच प्रमोशनशी संबंधित चांगली बातमी मिळेल. प्रत्येक टप्प्यावर मित्रांकडून सहकार्य मिळेल.

**सिंह**
मुलांकडून काही चांगली बातमी मिळू शकते. वैवाहिक जीवन आनंदाने भरलेले असेल. आजचा दिवस आरोग्याच्या दृष्टीने तुमच्यासाठी उत्तम राहील.

**कन्या**
उत्साहवर्धक काम करण्याची उत्सुकता वाढेल. आज तुमचे आरोग्य चांगले राहील, तुम्ही उर्जेने परिपूर्ण असाल. सरकारी नोकऱ्या असलेल्या लोकांना प्रमोशनशी संबंधित बातमी मिळेल.

**तुळ**
दिवस तुमच्यासाठी छान असेल. बेरोजगारांना रोजगाराच्या संधी मिळतील. प्रलंबित कामांमध्ये यश मिळेल. विद्यार्थी अभ्यासात रस घेतील आणि जबाबदाऱ्या समजून घेतील.

**वृश्चिक**
धार्मिक कार्याकडे तुमचा कल राहील. इतरांना मदत करण्यात रस वाढेल. जर तुम्ही कोणाकडून पैसे घेतले असतील तर तुम्ही ते लवकरच परत कराल.

**धनु**
तुम्हाला प्रत्येक टप्प्यावर मित्रांकडून सहकार्य मिळेल. आजचा दिवस तुमच्यासाठी छान असेल. बेरोजगारांना रोजगाराच्या संधी मिळतील. सर्व प्रलंबित कामांमध्ये यश मिळेल.

**मकर**
नवीन व्यवसाय सुरू करणे तुमच्यासाठी फलदायी ठरेल. या राशीच्या लोकांची आर्थिक परिस्थिती आज अत्यंत सुखद असेल. बाहेर फिरण्यासाठी जाण्याचा बेत आखाल. खर्चावर नियंत्रण ठेवा.

**कुंभ**
वैवाहिक जीवनात आनंद दिसून येईल. स्थिती देखील मजबूत होईल. ऑफिसमध्ये जास्त कामामुळे तुमच्या प्रवास करण्याचा बेत रद्द होईल.

**मीन**
विद्यार्थी अभ्यासात रस घेऊन त्यांच्या जबाबदाऱ्या चांगल्या प्रकारे समजून घेतील. नवीन व्यवसाय सुरू करणे फलदायी ठरेल. आज या राशीच्या लोकांची आर्थिक स्थिती मजबूत होईल.

## कल्याणात स्वामी समर्थ मठामध्ये
# धार्मिक वातावरणात दत्तजंयती संपन्न





**दै.ठाणे जीवनदीप वार्ता**
**प्रतिनिधी**

कल्याण : कल्याणातील बिर्ला कॉलेज रोड, फॉरेस्ट कॉलनी स्वामी समर्थ मठ येथे सदगुरु श्री स्वामी समर्थ सेवा ,ट्रस्ट कल्याण पश्चिम यांच्या वतीने सालाबादप्रमाणे यंदाही श्री दत्त जयंती उत्सव सोहळा शनिवारी भक्ती पूर्ण वातावरणात संपन्न झाला.

कल्याण पश्चिमेतील फॉरेस्ट कॉलनी येथील वनश्रीने नटलेल्या स्वामी समर्थ मठाची स्थापना गुरूवर्य नवनितानंद महाराज ( मोडक महाराज) यांनी केली असून मठाच्या प्रवेशद्वाराजवळ पुरातन वटवुक्ष असुन मठात स्वामी समर्थ, साईबाबा, गजानन महाराज ,आई मोराई माता, यांचे चांदीचे मुखवटे असून ,स्वामी गुर्भगुहातील पादुका असून या मठातील देव,देवीची पोशाख केलेली रूप पाहता भक्तांच्या डोळयाचे पारणे फिटते. मठ परिसरात दत्त मंदिर,रिद्धी सिध्दी गणपती मंदिर काशीविश्वेर शंकर मंदिर, संतोषी माता मंदिर, मारूती मंदिर, गुरूवर्य नवनितानंद महाराज समाधी मंदिर अशी मंदिरे असून भाविकांची सतत ओघ असतो.

सालाबादप्रमाणे यंदाही स्वामी समर्थ मठात दत्त जंयती उत्सावा निमित्त मठामधील स्वामींच्या पादुकांवर सकाळी अभिषेक करून कार्यक्रमाची सुरुवात झाली. या उत्सवानिमित्त होमहवन, आरती महाप्रसाद , गुरुपादुकाष्टाक, मानसपुजा, हरिपाठ, ( सदगुरू श्री स्वामी समर्थ महिला भजनी मंडळ) यांनी सुश्राव्य भजन केले.

संध्याकाळी स्वामी समर्थ मठ ते किल्ले दुर्गाडी (दुर्गाडी माता) पालखी सोहळा संपन्न झाला. यानिमित्ताने किल्ले दुर्गाडीवर दुर्गाडी मातेची आरती अवधूतानंद यांच्या हस्ते करण्यात आली.भगव्या मय वातावरणात गुरूबंधू ,गुरूभगिनी ,उपस्थित भविक यांनी आरतीत सहभागी होत दुर्गा मातेचा जयघोष केला. महाआरती तसेच संगीत भजन सदगुरु श्री स्वामी समर्थ प्रसादिक भजन मंडळ चे भजन संपन्न झाले.

दत्त जयंती उत्सवानिमित्ताने तीर्थप्रसाद, महाप्रसाद कार्यक्रम संपन्न झाला. दहा हजारहून अधिक भविकांनी महाप्रसादाचा लाभ घेतला. या कार्यक्रमाचे यशस्वी नियोजन स्वामी समर्थ मठाचे मठाधिपती परमानंद महाराज, अवधूतानंद महाराज यांच्या मार्गदर्शन खाली गुरूबंधू गुरूभगिनी सेवा करीत केले. दत्त जयंती उत्सावाच्या निमित्ताने दर्शन, धर्मिक अध्यात्मिक , तसेच तीर्थ प्रसाद ,महाप्रसादाचा लाभ दत्त भक्त, स्वामी सर्मथ भक्त, भविकांनी घेतला.

## श्रमिक संर्पक अभियाना निमित्त
# रायगड, पनवेल मध्ये कंत्राटी कामगारांचे मेळावे

**दै.ठाणे जीवनदीप वार्ता**
**प्रतिनिधी**

**कल्याण :** भारतीय मजदूर संघ ७० वर्ष पूर्ण करत आहे. भारतीय मजदूर संघाचे संस्थापक दत्तोपंत ठेंगडी यांनी आपले जीवन कामगार हितार्थ समर्पित केले कायम, कंत्राटी, संघटित, असंघटीत कामगारांचे नेतृत्व करत शेवटच्या घटकाला न्याय मिळवून देण्यासाठी राष्ट्रहित उद्योगहित कामगार हित या त्रिसूत्रीवर काम करत त्याग तपस्या आणि बलिदान देणारे अनेक कार्यकर्ते संघाने घडवले. आज तीन कोटी पेक्षा जास्त सदस्य संख्या असलेले देशातील मजबूत व बलाढ्य असे हे संघटन आहे या मध्ये कंत्राटी कामगार, आऊटसोर्सिंस कामगार, बांधकाम कामगार, घरेलु कामगार , क़ायम कामगार, आदी कामगारांनी आपल्या न्याय हक्कांच्या करिता, अन्याय, शोषण ना पासून मुक्त होण्यासाठी भारतीय मजदूर संघाच्या संघटनेत एकजुटीने सहभागी व्हावे असे आवहान रायगड जिल्हा मधील कोलाड व पनवेल येथे झालेल्या महाराष्ट्र विज कंत्राटी



कामगार संघ (संलग्न भारतीय मजदूर संघ) च्या कामगार मेळावा मध्ये अखिल भारतीय ठेका मजदूर महासंघाचे व संघटनेचे सरचिटणीस सचिन मेंगाळे यांनी केले आहे.

या वेळी मंचावर संघटनेचे संघटन मंत्री उमेश आणेराव, उपमहामंत्री राहूल बोडके, केंदीयु उपाध्यक्ष कमाल खान पुणे जिल्हा अध्यक्ष सुमीत कांबळे, रायगड जिल्हा सचिव सुधीर शिर्के उपस्थित होते.

भारतीय मजदूर संघाच्या वीज कंत्राटी कामगार संघाच्या वतीने १ ते २० डिसेंबर श्रमिक संपर्क अभियान आयोजित केले आहे. तळागाळातील शोषित पीडित वंचित कामगारांना प्रत्यक्ष भेटून त्यांच्या समस्यां जाणून घेण्यासाठी प्रत्येक जिल्ह्यात जाऊन कामगारांशी संवाद साधणार आहे. संघटनेचे अध्यक्ष नीलेश खरात यांनी संभाजी नगर, जालना, नांदेड, मराठवाडा विभागातील कामगारांच्या मेळावा ला चांगला प्रतिसाद मिळाला आहे.

मागील सरकार काळात संघटनेने सतत संघर्ष केल्या या मुळेच तिन्ही कंपनीतील कंत्राटी कामगारांना १९३ पगार वाढ, पगारवाढीचा फरक, भरतीमध्ये वयात सवलत, जादा १० गुण, अपघाती मृत्यू पश्चात वारसाला ४ लाख आर्थिक निधी, ५ लाख रुपयांचे विमा कवच, राष्ट्रीयकृत बँक वेतन खाते, आय टी आय करण्यास मुदत वाढ असे अनेक लाभ ४२००० कंत्राटी कामगारांना मिळवून दिल्याने कामगारांना निश्चितच दिलासा मिळाला आहे.

नवीन सरकार मधील ऊर्जामंत्री व कामगार मंत्री हे आगामी काळात देखील नक्कीच सहकार्य करून संघटीत असंघीटत क्षेत्रातील कामगारांच्या प्रलंबित समस्यांवर निश्चितच तोडगा काढतील असा विश्वास उमेश आणेराव व राहूल बोडके यांनी व्यक्त केला आहे. रायगड जिल्हा, नवी मुंबई, विभागातील कंत्राटी कामगारांच्या समस्यावर आवाज ऊठवणार असे मनोगत कमाल खान यांनी केले.

रायगड जिल्हा मधील सर्व कामगारांनी एकजुटीने भारतीय मजदूर संघाच्या संघटनेत सहभागी व्हावे असे आवहान भारतीय मजदूर संघ जिल्हा सचिव अशोक निकम यांनी केले.

## फुलझाडांच्या जतनाचा संदेश देत
# कल्याणातील सायकल वीरांची सह्याद्रीस्वारी

### नामवंत डॉक्टर, उद्योजक, वकील,आयटी तज्ज्ञांचा सहभाग



**दै.ठाणे जीवनदीप वार्ता**
**प्रतिनिधी**

**कल्याण :** कल्याणातील बाईकपोर्ट सायकलिंग ग्रुपतर्फे गेल्या पाच वर्षांपासून पर्यावरण रक्षणासह विविध महत्त्वाचे सामाजिक संदेश घेऊन देशाच्या कानाकोपऱ्यात सायकल मोहिमा राबवित जनजागृतीचा वसा जोपसत आहेत. तसेच दिव्यांग व्यक्ती, समाजातील गरजूंना शिक्षण, गरीब रुग्ण, कोवीड जनजागृती अशा ज्वलंत विषयांद्वारे आपली सामाजिक जबाबदारी बांधलकी जपत आले आहेत. यंदाच्या साहव्या वर्षीचे औचित्य साधत निसर्गामध्ये फळ झाडांसोबतच फुलझाडांचेही तितकेच महत्त्वाचे स्थान आहे. त्यामुळे या फुलझाडांच्या संवर्धन आणि जतन करण्याचा सामाजिक संदेश देण्यासाठी कल्याणातील १० सायकलवीर शनिवारी सह्याद्रीच्या दिशेने रवाना झाले.

महाराष्ट्राची 'फ्लॉवर व्हॅली' अशी ओळख असलेल्या कास पठार सह्याद्रीच्या कुशीत वसलेल्या निसर्गसुंदर ठिकाणांना ते भेट देणार आहेत. फुलझाडांचे संवर्धन करण्याचा संदेश घेऊन हे दहा सायकलस्वार सह्याद्रीच्या दऱ्याखोऱ्यांमध्ये तब्बल १ हजार किलोमीटर अंतराचा टप्पा पूर्ण करीत मोहीम फत्ते करणार आहेत. कल्याणातील रनमशीन अशी ओळख असणारे सुप्रसिद्ध धावपटू दिलीप घाडगे यांनी फ्लॅगऑफ केल्यानंतर हे सायकलस्वार आपल्या मोहिमेला रवाना झाले.

शनिवार पासून सुरू झालेला त्यांचा हा दहा दिवसांचा सायकल प्रवास कल्याण, माळशेज, नारायणगाव, शिक्रापूर, जेजुरी, फलटण, माळशिरस, म्हसवड, वळूच, सातारा, कास पठार, तापोळा, महाबळेश्वर, वाई, मांढरदेव, भोर, खेड शिवापूर, लवासा, ताम्हिणी घाट आणि पाली करून पुन्हा कल्याणमध्ये समाप्त होणार असल्याची माहिती डॉ. रेहनुमा यांनी दिली.

कल्याणातील उद्योगपती, डॉक्टर, आय टी तज्ज्ञ आदी मान्यवर मंडळी यामध्ये सहभागी झाली असून त्यामध्ये डॉ. रेहनूमा, सहिर शेख, सी. के. साबळे, अनिल उच्छील, अमित मोरे, आलतमाश कुरेशी, मिलिंद देशमुख, किरण शेट्टी, प्रतीक गरवारे, स्वामिनाथन अय्यर या दहा जणांचा समावेश आहे.



## साकेत महाविद्यालयात
# नागरी संरक्षण प्रशिक्षण संपन्न

**दै.ठाणे जीवनदीप वार्ता**
**प्रतिनिधी**

कल्याण : कल्याण पूर्व साकेत कला विज्ञान वाणिज्य महाविद्यालय व राष्ट्रीय सेवा योजना अंतर्गत नागरिक संरक्षण दल चार दिवसीय प्रशिक्षण शिबिर नुकतेच संपन्न झाले.

६२ व्या नागरी संरक्षण दल वर्धापन दिन सप्ताह निमित्त माननीय विजय जाधव उपनियंत्रक नागरी संरक्षण, नवी मुंबई समूह ठाणे यांच्या मान्यतेने संपन्न झाले. या प्रशिक्षणामध्ये आणी बाणीच्या उचल पद्धती,गाठीचे प्रकार,बँडेज,स्ट्रेचर ड्रिल, सीपीआर, अग्निशमन इत्यादी विषयावर प्रात्यक्षिके घेण्यात आली. या पाठ्यक्रमात ३८ प्रशिक्षणार्थी सहभागी झाले होते. पाठ्यक्रमाच्या प्रभारी सहाय्यक उपनियंत्रक दीपा घरत यांच्या मार्गदर्शनाखाली यशस्वीरित्या पाठ्यक्रम पुर्ण झाला.मानसेवी निदेशक राहुल घाटवल आणि यांनी प्रथमोपचार आणि अग्निशमन या विषयावर व्याख्यान आणि प्रात्यक्षिके घेतली.

प्रशिक्षणाचा समारोप दिनांक १४ डिसेंबर रोजी पार पडला. समारोप कार्यक्रमा मध्ये प्रमुख अतिथी म्हणून कोळशेवाडी पोलीस स्टेशन सहाय्यक उपनिरीक्षक नाईक उपस्थित होते. तसेच साकेत महाविद्यालयाचे प्राचार्यचे प्राचार्य वसंत भऱ्हाटे, उपप्राचार्य डॉ. प्रसिना बिजू , अकॅडमी समन्वयक प्रियंका मुंडे, राष्ट्रीय सेवा योजनेचे प्रमुख संजय चौधरी, संचिता पांडा, सं.दल उपमुख्य क्षेत्ररक्षक क्षेत्र ३ कमलेश श्रीवास्तव , सगीर नजीर खान विभागीय क्षेत्ररक् कल्याण पुर्व.हे सर्व मान्यवर उपस्थित होते.

## सार्वजनिक वाचनालय व कल्याण डोंबिवली मनपाचा संयुक्त उपक्रम
# ' विद्यार्थी चालवितात वाचनालय'



**दै.ठाणे जीवनदीप वार्ता**

**कल्याण :** थोर साहित्यिकांच्या पदस्पर्शाने पावन असलेल्या सार्वजनिक वाचनालय कल्याण येथून विद्यार्थी निश्चितच आयुष्यभराची शिदोरी घेऊन जातील. या विद्यार्थ्यांनी इथे असणाऱ्या पुस्तकांची माहिती, अनुभव वर्गातील इतर मित्र मैत्रिणींपर्यंत पोहचविण्यास वाचनसंस्कृती वृद्धिगत करण्याचा वाचनालयाचा मानस पूर्णत्वास येईल असे मत कॅ.रविंद्र माधव ओकचे मुख्याध्यापक उत्तम गायकवाड यांनी सार्वजनिक वाचनालय कल्याण, कल्याण डोंबिवली महानगरपालिका यांच्या संयुक्त विद्यमाने पु.भा. भावे व्याख्यानमाले अंतर्गत 'विद्यार्थी चालवितात वाचनालय' या उपक्रमाचा सांगता समारंभ प्रसंगी मांडले. विद्यार्थ्यांनी तीन दिवस वाचनालयाचा कारभार हाती घेऊन अत्यंत उत्कृष्टपणे सांभाळला. वाचकांशी सुसंवाद साधून अनेक साहित्यिकांची ओळख विद्यार्थ्यांनी करुन घेतली.'वाचनालयातील माझे अनुभव ', लेखक स्पर्धा अशा स्पर्धाही घेण्यात आल्या. त्यात सृष्टी पाटील या विद्यार्थिनीने समर्पक शब्दांत आपले अनुभव व्यक्त केले. वाचनालयाचे सरचिटणीस भिकू बारस्कर यांच्या संकल्पनेतून हा उपक्रम उत्तमरित्या राबविला जातो. सांगता समारंभ प्रसंगी अध्यक्ष मिलिंद कुलकर्णी, उपाध्यक्षा आशा जोशी,कार्यकारणी सदस्य अरविंद शिंपी, विजयसिंह परदेशी, शिक्षक भालचंद्र घाटे, दिलीप तडवी, वाचनालयाच्या ग्रंथसेविका, विद्यार्थीवर्ग उपस्थित होता.

# एनएमएमटीचे 'चालते फिरते' ग्रंथालय गायब

**दै.ठाणे जीवनदीप वार्ता**
**प्रतिनिधी**

**नवी मुंबई :** नवी मुंबई परिवहन सेवेने लांब पल्ल्याच्या मार्गांवरील प्रवाशांकरिता बसमध्ये 'लेट्स रिड इंडिया फाऊंडेशन' च्या माध्यमातून 'बुक्स इन बस' या नावाने चालते फिरते ग्रंथालय हा उपक्रम सुरू केला होता. प्रवासी वाहतूक सेवेमध्ये ग्रंथालय सुविधा हा देशातील पहिला उपक्रम म्हणून पालिकेने स्वतःची पाठ देखील थोपटून घेतली होती. मात्र आता पुस्तकांअभावी या ग्रंथालयाचे सांगाडे पडून आहेत.

### नियोजनाचा अभाव

**पुस्तके प्रवाशांनी पळविल्याचे सांगत परिवहनच्या कर्मचाऱ्यांनी हात झटकले आहेत. त्यामुळे मोठा गाजावाजा करुन सुरू केलेली ही योजना परिवहनच्या नियोजनाअभावी अयशस्वी ठरली आहे. अनेक वाचनप्रेमी प्रवाशांनी नाराजी व्यक्त करीत ही योजना पुन्हा सुरू करण्याची मागणी केली आहे.**

परिवहन सेवेच्या २६ व्या वर्धापनदिनाचे औचित्य साधून एनएनएमटी बसमध्ये प्रवाशांसाठी 'बुक्स इन बस' या उपक्रम सुरू केला होता. मराठी, इंग्रजी भाषेतील वाचनीय पुस्तके उपलब्ध करून दिली होती. याचा शुभारंभ तत्कालीन आयुक्त बांगर यांच्या उपस्थितीत केला होता. अनेक पुस्तकप्रेमींनी या उपक्रमाचे कौतुकही केले.

सुरुवातीला मंत्रालय, बोरीवलीकडे जाणाऱ्या वातानुकूलित गाड्यांमध्ये संस्थेने दिलेली मराठी, इंग्रजीतील नामवंत लेखकांची पुस्तके झळकली. वर्षभरापूवीपर्यंत ही पुस्तके निर्दशनास येत होती. मात्र आता ही योजना पूर्णतः बंद झाल्याचे दिसत आहे. सध्या एकाही बसमध्ये पुस्तक उपलब्ध नसून केवळ पुस्तकाच्या ग्रंथालयाचा सांगाडा दिसत आहेत. दरम्यान या विषयी लेट्स रिड इंडिया फाऊंडेशनच्या सदस्यांशी संवाद साधला असता त्यांनी पुस्तके देण्याचे काम संस्थेने केले आहे. त्यानंतर त्याचे नियोजन व जबाबदारी ही परिवहनची आहे, असे त्यांनी सांगितले.

## नालासोपाऱ्यातील कुख्यात गुंड
# राजकुमार गुप्ता स्थानबद्ध

**दै.ठाणे जीवनदीप वार्ता**

**वसई -** नालासोपारा येथील कुख्यात गुंड राजकुमार गुप्ता उर्फ राजू बैल याच्यावर झोपडपट्टी दादा प्रतिबंधक कायद्यान्वये (एमपीडीए) कारवाई करून तुरुंगात स्थानबद्ध करण्यात आले. २०२४ या वर्षातील स्थानबद्ध करण्याची तुळींज पोलीस ठाण्याची पहिली आणि आयुक्तालयातील ही तिसरी कारवाई आहे.

नालासोपारा पूर्वेच्या मोरेगाव येथे राहणारा राजकुमार लालचंद गुप्ता उर्फ लालू बैल (३६) याच्या विरोधात नालासोपारा आणि तुळींज पोलीस ठाण्यात अमली पदार्थांची तस्करी, मारमारी, शस्त्र बाळणे आदी विविध गुन्ह्यात १३ हून अधिक गंभीर गुन्हे दाखल आहेत. त्याची या परिसरात दहशत होती. फेब्रुवीर २०२१ मध्ये मोरेगाव नाका येथे पूर्ववैमनस्यातून ३ जणांनी तलवारीने हल्ला करून ५ राऊंड गोळीबार केला होता. या हल्ल्यात गुप्ता जखमी झाला होता. त्याच्या डोक्यात गोळी लागल्याने तो काही महिने रुग्णालयात कोमा मध्ये होता. रुग्णालयातून सुटल्यानंतर त्याने पुन्हा गुन्हेगारी कृत्य सुरू केले होते. त्याला पोलिसांनी हद्दपारही केले होते. मात्र तरी देखील त्याची गुन्हेगारी कृत्ये सुरू होती. त्याच्याविरोधात पोलिसांनी झोपडपट्टी दादा प्रतिबंधक कायद्याअन्वये (एमपीडीए) स्थानबद्ध करण्याची तयारी सुरू केली. ही प्रक्रिय पूर्ण केल्यानंतर त्याला अटक करून त्याची रवानगी नाशिक कारागृहात करण्यात आली आहे. परिमंडळ २ च्या पोलीस उपायुक्त पौर्णिमा चौगुले- श्रींगी यांच्या आदेशनुसार अनिल शिंदे, आकाश वाघ आदी पोलीस कर्मचाऱ्यांनी ही प्रक्रिया पार पाडली. या आरोपीवर अनेक गंभीर गुन्हे दाखल होते.



आज जिल्हा परिषद शाळा चिरड ता अंबरनाथ जिल्हा ठाणे येथील विद्यार्थ्यांना आपल्या संस्कृती ची जाणीव व जपवणूक हे कौशल्य साध्य होण्यासाठी व समाजसंपर्क वाढावा या दुष्टीने शिक्षक व सर्व विद्यार्थी यांनी दतजयंती उत्सव २०२४ मध्ये भाग घेऊन . सुंदर असे लेझीम नुत्य सादर केले.गावातील सर्व ग्रामस्थांनी विद्यार्थी चे खूप खूप कौतुक केले. लेझीम नुत्य मुख्याध्यापिका सौ छाया शिंदे मॅडम यांनी बसवले.यात इ १लीते ७वी चे २० विद्यार्थ्यांनी सहभाग नोंदवला होता.सराव आठ दिवस घेतला होता व लेझीम सादरीकरण विद्यार्थ्यांनी दत महोत्सव पालखी सोहळा मध्ये चिरड गावातील मंदिरा समोर व पालखी सोहळयात सादर केले.

## उल्हासनगर : चिखलमय रस्त्यांमुळे
# दुचाकीस्वारांच्या जिवाला धोका

**दै.ठाणे जीवनदीप वार्ता**
**उल्हासनगर, प्रतिनिधी**

नेताजी चौक परिसरात मंगळवारी रात्री एकापाठोपाठ तब्बल १६ दुचाकीस्वार स्लिप होऊन अपघातग्रस्त झाले. या अपघातांना महापालिकेच्या ठेकेदाराची अर्धवट कामाची आणि चिखलमय रस्त्यांची कारणीभूत परिस्थिती जबाबदार ठरत आहे.

नेताजी चौकात सध्या महापालिकेकडून ठेकेदारामार्फत सिमेंट कॉंक्रीटचे रस्ते खोदून ड्रेनेज लाईन टाकण्याचं काम सुरू आहे. मात्र, हे काम पूर्ण केल्यानंतर ठेकेदाराने रस्त्यांची योग्य दुरुस्ती न करता त्यावर माती टाकून परिस्थिती अधिक बिकट केली आहे. रस्त्यावर वाहणाऱ्या पाण्यामुळे माती चिखलात रूपांतरित झाली असून, त्यामुळे दुचाकीस्वारांच्या सवारीसाठी हा रस्ता प्राणघातक ठरत आहे. या दुर्दैवी घटनांदरम्यान एका जागरूक

### नेताजी चौकात १६ दुचाकींचा अपघात

नागरिकाने अपघाताची दृश्ये आपल्या मोबाईलमध्ये कैद केली. व्हिडिओद्वारे या घटनांची वास्तविकता प्रशासनासमोर मांडण्याचा प्रयत्न करण्यात आला आहे.

रात्रीच्या अंधारात चिखलमय रस्त्यांचा अंदाज न आल्याने अनेक दुचाकीस्वार स्लीप झाले. या अपघातांमध्ये काही स्वार किरकोळ जखमी झाले असून, नागरिकांमध्ये प्रचंड संताप निर्माण झाला आहे. अपघातांनंतर परिसरातील लोकांनी महापालिकेच्या हलगर्जीपणावर नाराजी व्यक्त केली आहे. या घटनांनंतर, नागरिक आणि स्थानिक रहिवाशांनी ठेकेदारावर कठोर कारवाई करून रस्त्यांची कायमस्वरूपी दुरुस्ती करण्याची मागणी केली आहे. वेळेवर योग्य उपाययोजना न झाल्यास असे अपघात भविष्यात मोठ्या दुर्घटनांचे कारण ठरू शकतात. या घटनेनंतर महापालिकेने ठेकेदारावर त्वरित कारवाई करावी, तसेच रस्त्यांची योग्य रितीने डागडुजी करून सुरक्षित वाहतुकीची हमी द्यावी, अशी मागणी नागरिकांकडून केली जात आहे. प्रशासनाकडून या प्रकरणाची दखल घेतली जाईल, अशी अपेक्षा सर्वसामान्य जनतेने व्यक्त केली आहे.

महाराष्ट्र शासन मान्यता प्राप्त
जीवनदीप शैक्षणिक संस्था, पोई संचलित
कौशल्य विकास केंद्र, गोवेली, म्हसा व खर्डी
कौशल्य, रोजगार, उद्योजकता व नाविन्यता विभाग संचलित
प्रवेश सुरु ! प्रवेश सुरु ! प्रवेश सुरु !
१) बांधकाम पर्यवेक्षक (कोड नं. ३०४२०२) — कालावधी १ वर्ष
२) पॅथोलॉजी टेक्नीशियन (कोड नं. २०१२३०) — कालावधी १ वर्ष
३) जनरल नर्सिंग आणि मिडवाइफरी असिस्टंट(GNMA) (कोड नं. २०१२३७) — कालावधी १ वर्ष
४) डिप्लोमा कोर्स इन मेडिकल लॅब टेक्निशियन (DMLT) (कोड नं. २०१४०४) — कालावधी २ वर्ष
५) सिक्युरिटी ॲण्ड फायर प्रिव्हिंजन प्रशिक्षण (कोड नं. ४११९२४) — कालावधी ६ महिने
पात्रता : १० वी / १२ वी / पदवी
CALL: 8108559566 / 9158518832 / 9619188558
संपर्क : जीवनदीप कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय गोवेली, पो.रायते, ता.कल्याण, जि.ठाणे

### वसई विरार महापालिकेने

# समुद्र स्वच्छतेसाठी आणलेले लाखो रुपयांचे यंत्र धूळखात



**दै.ठाणे जीवनदीप वार्ता**

**वसई :** वसई विरार शहराच्या पश्चिमेला विस्तीर्ण असा समुद्र किनारा आहे. या किनाऱ्यांची स्वच्छतेसाठी महापालिका व अर्नाळा ग्रामपंचायतीने समुद्र स्वच्छता यंत्र घेतली आहेत. मात्र सद्यस्थितीत त्या यंत्रांचा वापरच होत नसल्याने ही यंत्र धूळखात पडली असल्याचे चित्र दिसून येत आहे.

वसई विरारचा परिसर असून या परिसराला अर्नाळा, सुरुची, भुईगाव, रानगाव, नवापूर, कळंब असे समुद्र किनारे लाभले आहेत. हे समुद्र किनारे पर्यटनाच्या दृष्टीने आकर्षण ठरत असून या ठिकाणी मोठ्या संख्येने पर्यटक येत असतात.

समुद्र किनाऱ्याची स्वच्छता राखणे स्थानिक प्रशासनासाठी मोठे जिकरीचे काम ठरत होते. मनुष्यबळाचा वापर करून विस्तीर्ण समुद्र किनाऱ्यांची स्वच्छता करणे अशक्य ठरत होते.

किनाऱ्यावर लाटांसोबत मोठ्या प्रमाणात कचरा वाहून येत असतो तर काही वेळा पर्यटकांकडून कचरा टाकला जातो. यात प्लास्टिक व इतर प्रकारच्या कचऱ्याचा समावेश असतो. सामाजिक संस्थांच्या मदतीने अधून मधून समुद्र किनाऱ्यांची स्वच्छता मोहीम राबविली जाते. मात्र यात सातत्य राखणे अवघड असल्याने किनारे अस्वच्छ राहत होते. या समुद्र किनाऱ्यांची स्वच्छता यांत्रिक पद्धतीने करता यावी यासाठी वसई विरार महापालिकेने १५ व्या वित्त आयोगाच्या निधींमधून समुद्र किनारा सफाई यंत्र खरेदी केले होते.

यासाठी ६७ लाख रुपये इतका निधी खर्च केला होता. तर दुसरीकडे विरारचा अर्नाळा समुद्र किनारा हा ग्रामपंचायत हद्दीत येत असल्याने अर्नाळा ग्रामपंचायतीला महाराष्ट्र प्रदूषण नियामक मंडळाने 'ट्रॅक्टर बीच क्लिन मशीन' दिली होती. यंत्रणेचे उदघाटन होऊन काही महिने उलटून गेले तरीही मात्र ग्रामपंचायतीकडून या यंत्राचा वापरच केला गेला नाही. त्यामुळे ही यंत्रणा अक्षरशः धूळखात पडली असल्याचे चित्र दिसून येत आहे. लाखो रुपये खर्चून यंत्रणा घेतली त्यामुळे समुद्र किनारे स्वच्छ राहतील अशी आशा नागरिकांना होती. मात्र यंत्रणाच कार्यान्वित केली नसल्याने समुद्र किनारे कचरा व घाणीचे साम्राज्य पसरून अस्वच्छ राहू लागले आहेत असे नागरिकांनी सांगितले आहे. समुद्र स्वच्छता यंत्राच्या माध्यमातून समुद्र किनाऱ्यांची स्वच्छता केली जाणार होती. यात कचरा उचलणे, त्याचे संकलन करणे, संकलित केलेल्या कचऱ्याची विल्हेवाट लावणे, वाळूत साचून व अडकून असलेला कचरा चाळून त्या कचऱ्याचे संकलन करणे, वाळूचे सपाटीकरण करणे यासारखी कामेही होणार होती. मात्र यंत्रणाच कार्यान्वित नाही त्यामुळे यंत्र पडून आहेत.

**पर्यटनाला फटका बसण्याची शक्यता**

वसई विरार मधील समुद्र किनारे पर्यटनाच्या दृष्टीने महत्त्वाचे आहे. विशेषतः विकेंडला मोठ्या संख्येने पर्यटक या भागात पर्यटनासाठी येत असतात. पर्यटकांचे आर्कषण असलेले समुद्रकिनारे सध्या घाणीच्या विळख्यात सापडत आहे. या अस्वच्छतेमुळे येथील पर्यटनाला फटका बसण्याची शक्यता वर्तवली जात आहे.

यंत्र चालविली जात असल्याचा प्रशासनाचा दावा समुद्र किनारा सफाई यंत्र चालविली जात असल्याचा दावा प्रशासनाने केला आहे. राजोडी व सुरुची अशा दोन्ही समुद्र किनाऱ्यावर अधूनमधून स्वच्छता केली जात असल्याचे महापालिकेचे उपायुक्त नानासाहेब कामठे यांनी सांगितले आहे. तर अर्नाळा समुद्र किनाऱ्यावर ही यंत्र चालविले जाते. मात्र मनुष्यबळ नसल्याने अडचणी येत आहेत. त्यामुळे १५ दिवसातून एकदा आम्ही स्वच्छता करतो असे अर्नाळा ग्रामपंचायतीचे ग्रामसेवक नितीन राणे यांनी सांगितले

# टिटवाळा स्थाकात रेल्वे प्रशासनाचा सावळा गोंधळ

**दै.ठाणे जीवनदीप वार्ता**
**□ प्रतिनिधी**

**टिटवाळा :** अमृत भारत स्टेशन योजनेअंतर्गत गतीशक्ती विभागामार्फत देशातील अनेक रेल्वे स्थानकांचा कायापालट करण्यात येत आहे . मध्य रेल्वेच्या कसारा मार्गावरील टिटवाळा स्थाकाचा यात सामावेश आहे . या योजनेतील सर्व स्थानकांत अद्यावत सुविधा देण्याचा प्रशासनचा मानस असुन स्थानकांचे रुपडे पालटण्यासाठी यातील अनेक स्थानकांत काम सुरु आहे .मात्र टिटवाळा स्थानकात या योजनेला हरताळ फासण्याचे काम सध्या सुरु आहे . फलाट क्रमांक २ वर निर्धारीत केलेल्या उंचीपेक्षा अधिक उंचीचे बांधकाम केल्याने . ते पुन्हा तोडुन नव्याने बांधण्यात येत असल्याचे पाह्यला मिळाले .

अमृत भारत स्टेशन योजना ही रेल्वे मंत्रालयाने फेब्रुवारी २०२३ मध्ये देशभरात १२७५ स्थानकांचा पुनर्विकास करण्यासाठी सुरू केलेली आहे .? २४,४७० कोटी या



योजनेसाठी मंजुर करण्यात आले आहेत .तर महाराष्ट्रातील ४४ स्थानकांचा यात सामावेश आहे .मध्य रेल्वेच्या कसारा मार्गावरील टिटवाळा रेल्वे स्थांकात फलाट क्रमांक २ च्या कसा-याच्या दिशेने असलेल्या पहिल्या पहिल्या डब्याच्या ठिकाणी चालु असलेल्या बांधकामातला ढिसाळपणा आणि रेल्वे प्रशासनाचा हलगर्जीपणा उघड झाल्याचे समोर आले आहे . २७० मीटर लांबीच्या या फलाट क्रमांक २ वर ९० सेमी उंची वाढवुन चेकर्स टाकण्याचे काम सुरु आहे . काल या बांधकामाचा काही भाग पुर्ण करण्यात आला . मात्र आज या ठिकाणी पाहणी करण्यासाठी आलेल्या रेल्वेच्या सुपरवायझर (इंजिनिअर) ने सदरचे बांधकाम हे ९० सेमी नसुन ९२ सेमी असल्याचे निदर्शनास आणुन दिले . त्यामुळे ते आज पुन्हा तोडुन नविन बांधकाम करण्यात येत आहे . या प्रकारामुळे चालु असलेल्या या कामावर रेल्वे प्रशासनाचे नियंत्रण नसल्याचे स्पष्टपणे दिसुन येत आहे .

यामुळे रेल्वे प्रशासनाचा भोंगळ कारभार चव्हाट्यावर आला आहे . तर याबाबत स्टेशन प्रबंधक सत्यवीर सिंग यांना विचारले असता या सबंधित कामात ठेकेदराने चुक झाल्याचे इंजिनिअर यांनी पाहणी करुन सांगितले याबाबत दुरुस्ती करण्याच्या सुचना ठेकेदराला देण्यात आल्या आहेत . मात्र रेल्वे प्रवासी संघटना आणि प्रवासी वर्गाने यावार तीव्र नाराजी व्यक्त केली आहे.

### बदलापूर पूर्व भागात कुळगाव बदलापूर नगर परिषदेकडून

# अतिक्रमण कारवाईत दुजाभाव ?

**दै.ठाणे जीवनदीप वार्ता**
**□ प्रतिनिधी**

बदलापूर येथील पूर्व भागात कुळगाव बदलापूर नगर परिषदेच्या अतिक्रमण विरोधी पथकाने शुक्रवारी काही ठिकाणी फेरीवाल्यांवर कारवाई केली. मात्र या फेरीवाल्यांवर कारवाई करत असतानाच काही बड्या व्यापाऱ्यांनी अतिक्रमण करून उभारलेल्या खाद्य पदार्थांच्या स्टॉल्सला या कारवाईतून वगळल्याने नगरपरिषदेच्या कारवाई बाबत सर्वत्र प्रश्नचिन्ह उपस्थित केले जात आहे.

बदलापूर शहरातील खाद्य पदार्थाच्या गाडीवरील सिलिंडरचा स्फोट झाल्याने अनधिकृत पद्धतीने शहरात ठिकठिकाणी थाटण्यात आलेल्या फेरीवाल्यांच्या स्टॉल्सचा प्रश्न ऐरणीवर आला. यानंतर जागे झालेल्या कुळगाव बदलापूर नगरपरिषदेच्या अतिक्रमण विरोधी पथकाने अनधिकृत फेरीवाल्यांवर कारवाईचा बडगा उचलण्यास सुरुवात केली आहे. याच पार्श्वभूमीवर शुक्रवारी नगर परिषदेच्या अतिक्रमण विरोधी पथकाने बदलापूर पूर्व भागात स्टेशन ते कात्रप परिसरात कारवाई करून काही फेरीवाल्यांना तेथून हटविले. मात्र ही कारवाई करताना शहरातील घोरपडे चौकात एका मिठाईच्या दुकानासमोर थाटलेल्या सात ते आठ स्टॉलला या कारवाईतून वगळण्यात आले. यामुळे अतिक्रमण विभागाकडून कारवाईत दुजाभाव केला जात असल्याच्या सर्वत्र चर्चा रंगू लागल्या. यानंतर नगर परिषदेची ही कारवाई दुटप्पी असल्याचा आरोप फेरीवाला संघटनेचे निलेश येलवे यांनी केला. फेरीवाल्यांसह नगर परिषद कार्यालयात येऊन त्यांनी मुख्याधिकारी मारुती गायकवाड यांच्या विरोधात घोषणाबाजी केली. दिलेल्या आश्वासनाप्रमाणे फेरीवाल्यांना फेरीवाला क्षेत्र उपलब्ध करून न देता कारवाई केल्यास मोर्चा काढण्याचा इशाराही त्यांनी दिला.

सद्यस्थितीत बदलापुरात शहरात अनेक ठिकाणी अनधिकृत पद्धतीने फेरीवाल्यांकडून खाद्यपदार्थांची विक्री केली जात आहे. यामुळे नागरिकांना सातत्याने वाहतूक कोंडीला देखील सामोरे जावे लागते. तर खाद्यपदार्थ विक्री करणाऱ्या स्टॉल्स किंवा हातगाड्यांवर हे खाद्यपदार्थ तयार करण्यासाठी शेगडी, गॅस सिलिंडरचा वापर केला जाती. कोणत्याही प्रकारच्या आग प्रतिबंधात्मक उपाययोजना नसल्याने एखाद्या गर्दीच्या ठिकाणी असलेल्या अशा स्टॉल्स किंवा हातगाडीला आग लागल्यास पुन्हा एकदा मोठी दुर्घटना होण्याची शक्यता आहे.

शहरात बेकायदेशीर फेरिवाले आणि उघड्यावरच्या खाद्यपदार्थ विक्रेत्यांवर कारवाई करण्याची मोहिम सुरू करण्यात आली आहे. तात्पुरती कारवाई करण्याऐवजी कायमस्वरूपी कारवाई करण्याकडे आमचे लक्ष आहे. सध्या रेल्वे स्थानकाबाहेरील परिसरात कारवाई सुरू असून तो परिसर मोकळा करण्यात येतो आहे. लवकरच इतरत्र कारवाई केली जाईल.

**- मारूती गायकवाड,**
**मुख्याधिकारी,**
**कुळगाव बदलापूर नगरपालिका.**

## विद्यापीठाच्या निवडणूक...

पान १ वरून ▶▶ जोशी (खुला प्रवर्ग) बिनविरोध निवडून आले. नोंदणीकृत पदवीधर गटातून मिलिंद साटम (खुला प्रवर्ग) आणि शितल शेठ (अनुसूचित जाती प्रर्वग) यांची बिनविरोध निवड झाली.

विद्यापरिषदेवर व्यवस्थापन प्रतिनिधी गटातून रविंद्र घोडविंदे यांची बिनविरोध निवड झाली. स्थायी समिती या प्राधिकरणावर प्राचार्य गटातून प्रा. वसंत माळी आणि नोंदणीकृत पदवीधर गटातून प्रदीप सावंत यांची बिनविरोध निवड झाली. तर अध्यापक गटातून स्थायी समितीवर डॉ. अनूप पळसोकर हे ४७ मतांनी निवडून आले. अध्यापक व कर्मचारी तक्रार निवारण समितीवर अध्यापक गटातून डॉ. विनोद कुमरे हे ४८ मतांनी निवडून आले तर अध्यापकेत्तर कर्मचारी गटातून संतोष निकम यांची बिनविरोध निवड झाली.

मुंबई विद्यापीठाच्या विविध प्राधिकरणावर निवडून/नामनिर्देशाने आलेल्या सर्व मान्यवर सदस्यांचे मुंबई विद्यापीठाचे कुलगुरू प्रा. रवींद्र कुलकर्णी, प्र.कुलगुरू प्राचार्य डॉ. अजय भामरे आणि कुलसचिव डॉ. प्रसाद कारंडे यांनी स्वागत करून अभिनंदन केले. या निवडणूकीच्या कामी उपकुलसचिव (निवडणूक) विकास डवरे, सहाय्यक कुलसचिव रमेश दामसे आणि त्यांच्या चमूने अथक प्रयत्न घेतले. आज पार पडलेल्या निवडणूकीसाठी डॉ. विनोद पाटील, कुलसचिव, कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ, जळगाव यांचे विशेष सहाय्य लाभले.

## ३९ मंत्र्यांचा शपथविधी...

पान १ वरून ▶▶ नेत्यांना संधी देण्यात आली आहे. तर, ३९ कॅबिनेट व ६ राज्यमंत्री आहेत. अद्याप खातेवाटप झालेलं नाही. त्यामुळे, नेमकं कोणत्या मंत्र्यांना कोणतं खातं मिळणार, याकडे सर्वांचे लक्ष लागले आहे.

**मतदारसंघात जल्लोष, पेढे वाटून आनंद**

नागपूरमध्ये मंत्रिमंडळाचा विस्तार होत असताना ज्या जिल्ह्यातील नेत्यांना मंत्रीपदाची संधी मिळाली, त्या जिल्ह्यात समर्थकांनी व कार्यकर्त्यांनी एकच जल्लोष केल्याचं पाहायला मिळालं. त्यात, बीड जिल्ह्यात दोन नेत्यांना विशेष म्हणजे दोन मुंडेंना मंत्रिपदाची संधी मिळाली आहे. पंकजा मुंडेंच्या शपथविधीवेळी गोपीनाथ मुंडेंच्या नावाने घोषणाबाजी करण्यात आली. तर, येथील मतदारसंघात भाजप कार्यकर्त्यांनी मोठा जल्लोष केला. तर, आमदार भरत गोगावले हेही मंत्री झाल्याने त्यांच्या समर्थकांनीही आनंद व्यक्त केला. नितेश राणे यांच्या समर्थकांनी मुंबई आणि कणकवली मतदारसंघात पेढे वाटून, फटाके फोडून आनंद साजरा केला. यांसह, पहिल्यांदाच मंत्रिपदाची संधी मिळालेल्या नव्या चेहऱ्यांच्या मतदारसंघातही कार्यकर्त्यांचा उत्साह आणि आनंद पाहायला मिळाला.

## तीनशे मीटरपर्यंतच्या भूखंडावरील

पान १ वरून ▶▶ मंजूर केले जातात. कल्याण, डोंबिवली ही दोन्ही शहरे यापूर्वी गाव स्वरुपात होती. ग्रामपंचायत, नगरपालिका यांचे प्रशासन येथे होते. त्यावेळची गरज म्हणून नागरिकांनी आपल्या खासगी जमिनीवर कौलारू घरे, चाळींच्या जागी बंगले, इमारती बांधल्या. त्या बांधकामाच्या भूखंडाचे सर्व चटई क्षेत्र निर्देशांक यापूर्वीच मालकांनी वापरले. धोकादायक झालेली ही बांधकामे आता नव्याने उभारणीसाठी विकासक पुढे येत नाहीत. या बांधकामातून आम्हाला वाणिज्य किंवा सदनिकांच्या माध्यमातून वाढीव बांधकाम करणे शक्य होणार नाही, असा विकासकांचा दावा आहे. शहरातील ३५ ते ४० वर्षांपूर्वी बांधलेली आता धोकादायक स्थितीत असलेली बांधकामे नव्याने उभी करण्यासाठी कोणीही विकासक पुढाकार घेत नाही. अशा बांधकामांच्या परवानगीचे प्रस्ताव प्रभागस्तरावर स्वीकारले, तेथेच साहाय्यक आयुक्तांच्या पुढाकाराने मंजूर झाले तर नागरिकांना स्थानिक पातळीवर सुविधा उपलब्ध होईल. यासाठी नगररचना विभागाने सहकार्य करावे, अशी संकल्पना आयुक्त डॉ. इंदुराणी जाखड यांनी मांडली. हा प्रस्ताव आता अंमलात येत आहे.

एकत्रित विकास नियंत्रण प्रोत्साहन नियमावलीमुळे या बांधकामांना आता प्रभागस्तरावर आवश्यक त्या कागदपत्रांची पूर्तता करून मंजुरी मिळविणे जमीन मालक, बंगले, इमारत मालकांना शक्य होणार आहे, असे नगररचनेच्या एका अधिकाऱ्याने सांगितले. तसेच, १५० ते ३०० मीटरचे भूखंड जमीन मालकांनी व्यक्तीश किंवा भागीदारी पद्धतीने विकसित करण्याचा निर्णय घेतला. या बांधकामांसाठीची आवश्यक कागदपत्रांची पूर्तता केली तर प्रभाग स्तरावर या बांधकामाचे आराखडे मंजूर केले जाणार आहेत. या कामासाठी साहाय्यक आयुक्तांना नगररचना विभागातून कनिष्ठ अभियंता, साहाय्यक अभियंता यांचे साहाय्य देण्यात येणार आहे, असे नगररचनेतील एका अधिकाऱ्याने सांगितले.

पालिका हद्दीतील १५० ते ३०० मीटर भूखंडावरील बांधकामांचे प्रस्ताव विकास नियंत्रण नियमावली नियमांच्या अधीन राहून प्रभागस्तरावर मंजूर करण्याची संकल्पना आयुक्त डॉ. इंदुराणी जाखड यांनी मांडली. प्रायोगिक तत्वावर हा पथदर्शी प्रस्ताव राबविण्यात येत आहे. यामुळे लहान भूखंड विकसित होण्याचा मार्ग मोकळा होणार आहे.

**- सुरेंद्र टेंगळे,**
**प्रभारी साहाय्यक संचालक, नगररचना.**

या पथदर्शी प्रकल्पामुळे बंगले, घरांची बांधकामे नियमित करणे, लहान भूखंड विकसित करणे जमीन मालकांना शक्य होणार आहे. प्रभागस्तरावर हे प्रस्ताव मंजूर होणार असल्याने नागरिकांची सोय होणार आहे.

**- भारत पवार,**
**साहाय्यक आयुक्त,**
**आय प्रभाग.**

## रस्ता विचारण्यावरून वाद तरुणावर कोयत्याने हल्ला

**दै.ठाणे जीवनदीप वार्ता**
**□ प्रतिनिधी**


**कल्याण :** कल्याण पूर्वेत एक धक्कादायक घटना घडली आहे. रस्ता विचारल्याच्या कारणावरून शनिवारी रात्री तीन आरोपींनी एका तरुणाला लाथाबुक्यांनी मारहाण करीत त्यापैकी एका आरोपी ने तरूणांच्या डोक्यावर कोयत्याने घाव घातला. धीरज जावळे असे गंभीर जखमी झालेल्या तरुणाचे नाव असून त्याला उपचारासाठी कल्याण पूर्व येथील खासगी रुग्णालयात दाखल करण्यात आले आहे. याप्रकरणी पोलिसांनी गणेश शेवाळे नावाच्या तरुणाला अटक केली असून अक्षय गोगावले आणि विकी महानरवार यांचा शोध सुरू असल्याची माहिती कोळसेवाडी पोलिस ठाण्याचे व.पो.नि. अशोक कदम यांनी दिली.

**एकाला अटक दोन फरार**

कल्याण पूर्वेकडील नांदिवली परिसरात राहणारा धीरज जावळे हा त्याचा मित्र तेजस बरडे याच्यासोबत दुचाकीवरून कुठेतरी जात असल्याचे सांगण्यात येत आहे. विजयनगराजवळील रस्त्यावर खोदकाम करण्यात आले. समोरून येणाऱ्या एका दुचाकीस्वाराला धीरजने रस्ता खुला आहे की बंद अशी विचारणा केली. धीरजने विचारणा केली असता समोर बसलेल्या तरुणाने शिवीगाळ केली. त्याच्यासोबत दुचाकीवरून तिघेजण जात होते. धीरज म्हणाला की, आम्ही फक्त पुढचा मार्ग खुला आहे की बंद आहे, यात वाईट वाटण्यासारखे काही नाही, असे सांगून तीन तरुणांनी धीरज आणि त्याचा मित्र तेजस यांना मारहाण करण्यास सुरुवात केली.

हल्लेखोरांपैकी एकाने कोयत्याने धीरजच्या डोक्यात वार केला. त्यामुळे धीरज गंभीर जखमी झाला. याप्रकरणी तपास अधिकारी संदीप भालेराव यांनी ही घटना रात्री घडल्याचे सांगितले. याप्रकरणी आरोपी गणेश शेवाळे याला अटक करण्यात आली असून, अन्य दोन आरोपींचा शोध सुरू असून, लवकरच त्यांना अटक करण्यात येईल.

**दै. ठाणे जीवनदीप वार्ता**
मध्ये कंपनी, मिळकत, जमीन- जुमला, सहकारी संस्थांच्या नोटीस तसेच बक्षीसपत्र, घटस्फोट आणि पोटगी, नावात बदल बाबतच्या नोटीस प्रसिद्ध करण्यासाठी संपर्क साधा.
कार्यालय - 9619188558 ■ +91 9158078601
ईमेल- jeevandeepvartanews2020@gmail.com



## नवी मुंबई विमानतळाची धावपट्टी टेकऑफ आणि लँडिंग साठी सज्ज

**विमानतळावर प्राधिकरणाकडून आणखी एक यशस्वी चाचणी**

**दै.ठाणे जीवनदीप वार्ता**
**□ प्रतिनिधी**

**नवी मुंबई :** नवी मुंबई आंतरराष्ट्रीय विमानतळाच्या दक्षिण धावपट्टीवर वैमानिकांना विमान उतरविण्यावेळी धावपट्टीचा अचूक अंदाज मिळण्यासाठी धावपट्टीवरील दिव्यांच्या मार्गाची अचूक सूचना देणाऱ्या यंत्रणेची चाचणी एका लहान विमानाच्या साह्याने गुरुवारी सकाळी साडेआठ वाजता घेण्यात आली. ही चाचणी यशस्वी झाल्याची माहिती नवी मुंबई आंतरराष्ट्रीय विमानतळ प्राधिकरणाने (एनएमआयए) गुरुवारी सायंकाळी त्यांच्या समाजमाध्यमांवरील संकेतस्थळावर प्रसिद्ध केली होती. ही चाचणी यशस्वी झाल्याने विमानतळाच्या दक्षिण धावपट्टीवर लवकरच मोठे विमान उतरण्याचा मार्ग मोकळा झाला आहे.

भारतीय विमानतळ प्राधिकरणाच्या सहकार्याने गुरुवारी सकाळी नवी मुंबई आंतरराष्ट्रीय विमानतळाच्या दक्षिण धावपट्टीवरील ०८/२६ येथे चाचणी घेण्यात आली. गुरुवारी सकाळी तब्बल दोन तास धावपट्टीवर लहान विमान चाचणीसाठी घिरट्या घालत होते. विमान उतरविण्यासाठी वैमानिकांना धावपट्टीवरील मार्गाचा अचूक संदेश सूचकता दर्शविणाऱ्या दिव्यांचा आधार घ्यावा लागतो. धावपट्टीवरील दिवे मार्गातील अचूक सूचनेमुळे वैमानिकांना धावपट्टीवरील दृष्यमानता कमी असताना याच दिव्यांच्या आधारे विमान उतरवावे लागते. त्यामुळे या चाचणीला विशेष महत्त्व आहे. गुरुवारी ही चाचणी पूर्ण झाल्याने पुढील चार महिन्यात नवी मुंबई विमानतळावरुन विमानाचे उड्डाण होण्याची अपेक्षा व्यक्त करण्यात येत आहे.

तत्कालिन मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या उपस्थितीमध्ये ११ ऑक्टोबरला नवी मुंबई आंतरराष्ट्रीय विमानतळावर पहिले लढाऊ विमान सी- २९५ हे उतरविण्यात आले होते. नवी मुंबई आंतरराष्ट्रीय विमानतळावर दोन धावपट्टी आहेत. त्यातील दक्षिण धावपट्टी पहिल्या टप्प्यात सुरू होणार आहे. या धावपट्टीची ३७०० मीटर लांबीची आणि ६० मीटर रुंदीची आहे. पहिल्या टप्प्यात मालवाहू विमानतळ या विमानतळावरुन सुरू होणार आहे.

चाचणीचे महत्त्व विमान उतरविण्यासाठी वैमानिकांना धावपट्टीवरील मार्गाचा अचूक संदेश सूचकता दर्शविणाऱ्या विज दिव्यांचा आधार घ्यावा लागतो. धावपट्टीवरील दिवे मार्गातील अचूक सूचनेमुळे वैमानिकांना धावपट्टीवरील दृष्यमानता कमी असताना याच दिव्यांच्या आधारे विमान उतरवावे लागते. त्यामुळे या चाचणीला विशेष महत्त्व आहे.

'ठाणे जीवनदीप वार्ता' हे दैनिक मालक, मुद्रक, प्रकाशक, संपादक श्री. रविंद्र नारायण घोडविंदे तथा कार्यकारी संपादक विजय गोविंद यादव यांनी; महाराष्ट्र प्रिंटिंग प्रेस, हाऊस नंबर ८६२, उलनचाळ, अंबरनाथ (पश्चिम), जिल्हा - ठाणे, महाराष्ट्र - ४२१५०५ येथे छापून, एम/ए-१०६, एम टाईप बिल्डिंग, कृषी उत्पन्न बाजार समिती आवार, फोर्टीस हॉस्पिटल समोर, बैलबाजार, कल्याण (प.) जि.ठाणे ४२१३०१ येथून प्रसिद्ध केले. (या अंकात प्रसिद्ध होणाऱ्या बातम्या, लेख, जाहिराती इत्यादींशी संपादक सहमत असतीलच असे नाही)
मुख्य कार्यालय - एम/ए-१०६, एम टाईप बिल्डिंग, कृषी उत्पन्न बाजार समिती आवार, फोर्टीस हॉस्पिटल समोर, बैलबाजार, कल्याण (प.) जि.ठाणे ४२१३०१
संपर्क क्रमांक : ९६१९१८८५५८/९१५८०७८६०१ E Mail – jeevandeepvartanews2020@gmail.com / news.thanejeevandeep@gmail.com
RNI NO : MAHMAR/2016/72091 ■ Postal Registration No. THC/256/2022-2024 (सर्व कायदेशीर न्यायनिवाडा मा.कल्याण सत्र न्यायालयात) कायदेविषयक सल्लागार - ॲड. जयकुमार ए. रिजवानी